मराठी

# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# एचसीएमटीआर प्रकल्पाविरोधात हरकतींची बरसात!

## सार्वजनिक सेवा व सुविधांसाठी आरक्षणे, नवीन प्रकल्प प्रस्तावित; साडेतीनशे हरकती

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराचा नवीन सुधारित प्रारूप विकास आराखडा १४ मे रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्याचे नकाशे १६ मेपासून नागरिकांना पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले. आराखड्यावर आतापर्यंत ३५० हरकती महापालिकेकडे आल्या. चिखली एचसीएमटीआर (रिंग रोड) प्रकल्पांविरोधात सर्वाधिक हरकती आहेत.

महापालिकेच्या क्षेत्रासह पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून वर्ग केलेल्या एकत्रित प्रारूप विकास आराखडा तयार केला आहे. नकाशा महापालिका भवनातील सभागृहात खराळवाडी, नियोजन प्राधिकरण कार्यालयात उपलब्ध आहे.



महापालिकेने विकास आराखडा तयार करताना एमआयडीसी आणि पीएमआरडीएचे क्षेत्र वगळण्यात आले आहे. आराखड्यात शहरातील विविध प्रकल्पांसाठी आरक्षणे टाकण्यात आली आहेत. त्याबाबत नागरिकांकडून १६ मेपासून ६० दिवसांच्या हरकती व सूचना मागविल्या आहेत. संकेतस्थळावरही नकाशा पाहता येतो. विकास आराखड्यामध्ये पुररेषेमध्ये फेरफार केल्याचा आरोप करण्यात आला आहे तर दुसरीकडे बासनात गुंडाळलेला रिंगरोड प्रकल्प पुनर्जीवित करण्यात आल्याने नाराजी वाढत आहे.

### आरक्षणाबाबत विरोधाभास

» शहरातील अनेक भागांत मोठ्या प्रमाणात विविध आरक्षणे टाकण्यात आली आहेत. काही ठिकाणचे आरक्षण परस्पर रद्द करण्यात आले आहे. बांधकाम परवानगी घेऊनही त्या ठिकाणी आरक्षण टाकल्याचे प्रकार समोर आले आहेत. त्या आरक्षणांना आक्षेप घेत आतापर्यंत एकूण ३५० हरकती महापालिकेकडे आल्या आहेत. त्यात सर्वाधिक हरकती चिखली, एचसीएमटीआर (रिंग रोड) व इतर भागांतील आहेत.

---

# आषाढी वारी पालखी सोहळ्यातील सेवा सुविधांचा आढावा

## पालखी मार्गाची पोलीस व महापालिका प्रशासनाकडून पाहणी; स्वागताची तयारी अंतिम टप्प्यात

**पिंपरी | प्रतिनिधी**

आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या स्वागताची तयारी अंतिम टप्प्यात आली असून पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी पालखी मार्गाची मंगळवारी (२७ मे) पाहणी केली.

पिंपरी चिंचवड शहरात जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे १९ जून रोजी आगमन होणार असून यादिवशी पालखीचा मुक्काम आकुर्डी येथे असणार आहे. तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे पिंपरी चिंचवड हद्दीमध्ये २० जून रोजी आगमन होणार असून त्याच दिवशी पालखी पुण्याच्या दिशेने मार्गस्थ होणार आहे. या दोन्ही सोहळ्याच्या स्वागत आणि नियोजनासाठी पोलीस आणि महापालिका प्रशासन सुक्ष्म नियोजन करीत आहे. या अनुषंगाने आज पोलीस व महापालिका प्रशासनाच्या वतीने पालखी मार्गाची संयुक्त पाहणी करण्यात आली.





या पाहणी दौऱ्यावेळी महापालिका शहर अभियंता मकरंद निकम, सह शहर अभियंता बापू गायकवाड, देवन्ना गट्टूवार, उपायुक्त अण्णा बोदडे, राजेश आगळे, सचिन पवार, सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, कार्यकारी अधिकारी शिवराज वाडकर, संतोष दुर्गे, अपर पोलीस आयुक्त सारंग आव्हाड, पोलीस उप आयुक्त डॉ. शिवाजी पवार, बापू बांगर यांच्यासह पोलीस आणि महापालिका प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते.

### पालखी मार्गावरील खड्डे बुजवा : आयुक्त

» आषाढीवारी पालखी सोहळ्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांमध्ये कोणत्याही प्रकारची कमतरता राहणार नाही, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने सोयीसुविधांचे नियोजन करावे. पालखी मार्गावर पावसाचे पाणी कोठेही तुंबणार नाही, याची दक्षता घेऊन या मार्गावरील खड्डे बुजविण्याच्या सुरु असलेल्या कार्यवाहीचा वेग वाढवावा. वारकऱ्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी योग्य त्या सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश यावेळी आयुक्त सिंह यांनी दिले. पालखी सोहळा मार्गावर वारकऱ्यांसाठी देण्यात येणाऱ्या सुविधांचा आढावा यावेळी घेण्यात आला.

# पीएमपी बसमध्ये 'एआय' कॅमेऱ्यांची 'नजर'

## केंद्राकडे प्रस्ताव; प्रवासी सेवेचा दर्जा सुधारण्यास, गैरप्रकार रोखण्यास मदत होणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) बसमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित (एआय) कॅमेऱ्यांची चाचणी यशस्वी ठरली आहे. आता सर्व बसमध्ये 'एआय' कॅमेरे बसविण्यासाठीचा प्रस्ताव केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाकडे पाठविण्यात आला आहे. या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर 'पीएमपी'चा प्रवासी सेवेचा दर्जा सुधारण्यास आणि गैरप्रकार रोखण्यास मदत होणार आहे. येत्या काही दिवसांत दिल्लीतील शिष्टमंडळासमोर याचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

मंत्रालयाकडून परवानगी प्राप्त होताच सर्व बसमध्ये 'एआय' कॅमेरे बसविण्यात येणार असून, त्यासाठी सुमारे चार कोटींचा खर्च अपेक्षित असल्याची माहिती 'पीएमपी' प्रशासनाकडून देण्यात आली.




'निवडक बसमध्ये 'एआय' आधारित कॅमेरे बसवून नुकतीच चाचणी घेण्यात आली. ही चाचणी विनाअडथळा यशस्वी ठरली. पीएमपीचा दर्जा सुधारून अपघात आणि वेगावर नियंत्रणही ठेवण्यात येणार आहे. तसेच, चालक, वाहक आणि प्रवाशांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येणार आहे,' अशी माहिती 'पीएमपी'च्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळ-मुंडे यांनी दिली.

### प्रत्येक बसमध्ये दोन 'एआय' कॅमेरे

पीएमपीच्या प्रत्येक बसमध्ये दोन 'एआय' कॅमेरे लावण्यात येणार आहेत. त्यांपैकी पहिला कॅमेरा चालकाच्या 'स्टिअरिंग'जवळ, तर दुसरा कॅमेरा बसमधील शेवटच्या भागात लावण्यात येणार आहे. त्यामुळे चालकाच्या हालचालीपासून बसमध्ये प्रवासी प्रवेश करण्यापासून उतरेपर्यंतचे सर्व चित्रीकरण याद्वारे होईल. तसेच बसमध्ये 'जीपीएस' असल्याने बस कोठे, किती वेगाने संचलन करत आहे, यावर नियंत्रण कक्षातून बारकाईने लक्ष ठेवण्यात येणार आहे.

### कॅमेऱ्यांचा फायदा

- विनातिकीट प्रवास करणाऱ्यांवर लक्ष राहणार
- प्रवाशांची संख्या तातडीने मोजून संबंधित संदेश नियंत्रण कक्षाला समजणार
- चालकाच्या चेहऱ्यावरील हावभाव टिपले जाणार असून, वेगमर्यादेवर नियंत्रण ठेवण्यास मदत
- चालकाची मानसिक, शारीरिक स्थिती सुस्पष्ट होणार
- वादविवादाच्या पार्श्वभूमीवर पुरावा म्हणून उपयोग
- संचलनातील त्रुटी आणि अडथळे दूर करता येणे शक्यकोट

> 'पीएमपी' प्रवासाभिमुख आणि सक्षम करण्यासाठी बसमध्ये 'एआय' कॅमेरे लावण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबतची चाचणी यशस्वी झाली असून, संबंधित अहवाल केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाकडे पाठवला आहे. मंजुरी मिळताच याबाबत कार्यवाही केली जाणार आहे.
>
> **- दीपा मुधोळ-मुंडे, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पीएमपी.**

# माळेगाव कारखान्याच्या निवडणुकीत अजित पवार

## अजित पवार यांनी स्वतः उमेदवारी अर्ज दाखल केला, राजकीय रंगत वाढली

**पुणे | प्रतिनिधी**

बारामतीच्या राजकारणावर प्रभाव टाकणाऱ्या माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या रिंगणात उपमुख्यमंत्री अजित पवार उतरले आहेत. पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला असून, त्यांच्या पॅनेलविरोधात कारखान्याचे माजी अध्यक्ष चंद्रराव तावरे यांच्या पॅनेलबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचेही पॅनेल निवडणूक लढविणार असल्याने पवार यांच्यासमोर कडवे आव्हान उभे राहिले आहे. अजित पवार उमेदवारी अर्ज कायम ठेवणार की माघार घेणार, यावर या निवडणुकीची रंगत अवलंबून आहे.

माळेगाव कारखान्याची निवडणूक ही उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासाठी प्रतिष्ठेची समजली जात आहे. माजी अध्यक्ष चंद्रराव तावरे आणि रंजन तावरे यांच्या पॅनेलचे मोठे आव्हान आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षही ताकद दाखविणार आहे. त्यामुळे ही निवडणूक रंगतदार होण्याची शक्यता आहे. इंदापूरमधील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्ष तटस्थ भूमिकेत होता. मात्र, या कारखान्याच्या निवडणूक लढविण्याच्या निर्णयामुळे उपमुख्यमंत्री पवार यांच्यासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची झाली आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा मंगळवारी शेवटचा दिवस होता. उपमुख्यमंत्री पवार यांनी प्रतिनिधीमार्फत अर्ज दाखल केला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर मेळावा घेत या कारखान्याची निवडणूक पूर्ण ताकदीने लढणार असल्याचे जाहीर केले होते. ज्येष्ठ नेते चंद्रराव तावरे आणि रंजन तावरे यांनी दोन वेळा या कारखान्यावर वर्चस्व सिद्ध केले आहे.

श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने माघार घेतली होती. मात्र, या कारखान्याच्या निवडणुकीसाठी इच्छुकांनी अर्ज दाखल केले आहेत. तसेच, कष्टकरी शेतकरी समितीचेही पॅनेल केले जाणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या कारखान्याच्या निमित्ताने बारामतीत राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

### निवडणुकीची पार्श्वभूमी आणि रणनीती

माळेगाव कारखान्याच्या निवडणुकीला पवार कुटुंबासाठी नेहमीच प्रतिष्ठेचा विषय राहिला आहे. २०१५ मध्ये चंद्रराव तावरे आणि रंजन तावरे यांच्या नेतृत्वाखालील गटाने अजित पवार यांच्याकडून कारखान्याची सत्ता हिसकावली होती. मात्र, २०२० मध्ये अजित पवार यांनी जोरदार पुनरागमन करत २१ पैकी १७ जागा जिंकून राष्ट्रवादीचा झेंडा पुन्हा फडकवला. यंदा, अजित पवारांनी स्वतः उमेदवारी अर्ज भरल्याने ही निवडणूक आणखी चुरशीची ठरणार आहे.



### अर्ज माघारीकडे लक्ष

- या निवडणुकीसाठी दाखल झालेल्या ५९३ उमेदवारी अर्जांची २८ मे रोजी छाननी होणार आहे. २९ मे ते १२ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची मुदत आहे. या कालावधीत उपमुख्यमंत्री पवार उमेदवारी अर्ज मागे घेणार का, याकडे लक्ष असणार आहे. १३ जून रोजी अंतिम उमेदवार यादी जाहीर होणार आहे. त्यामुळे या कारखान्याच्या निवडणुकीसाठी कोणाला संधी मिळणार आणि किती पॅनेल असणार, हे स्पष्ट होणार आहे.

# पिंपरी चिंचवडमध्ये जोरदार पाऊस

## चिखली, रुपीनगर, दापोडी, आकुर्डी भागातील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पाणी शिरले



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात सलग दुसऱ्या दिवशी (मंगळवारी) दिवसभर जोरदार पाऊस झाला. यामुळे चिखली घरकुल वसाहत, रुपीनगर, दापोडी, आकुर्डी भागातील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पाणी शिरले. भूमकर चौकासह शहरातील विविध ठिकाणच्या भुयारी मार्गासह सखल भागात पाणी साचले. त्यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला. महापालिकेच्या पथकाने घटनास्थळी जाऊन पाण्याचा उपसा केला. काही ठिकाणी सोसायट्यांनाच पाण्याचा उपसा करावा लागला. संततधारेमुळे आळंदीतील इंद्रायणी नदीचे पात्र दुथडी भरून वाहत असून, पुंडलिक मंदिर पाण्याखाली गेले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात सोमवारी दिवसभर पाऊस कोसळला. रात्रीही पावसाची रिमझिम सुरू होती. मंगळवारी सकाळी पुन्हा पावसाचा जोर वाढला. दिवसभर पाऊस कोसळत होता. शहरातील पिंपरी, चिंचवड, भोसरी, आकुर्डी, निगडी, सांगवी, ताथवडे, मामुर्डी, वाकड, पिंपळेगुरव, पिंपळेनिलख परिसरात जोरदार पाऊस झाला. पावसामुळे अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचले होते. भुयारी मार्गात गुडघाभर पाणी साचल्याने वाहतूक संथगतीने सुरू होती. त्यामुळे काही भागांत वाहतूक कोंडी झाली होती. पुणे-बंगळुरू महामार्गावर ताथवडे सेवा रस्त्यावर, भूमकर चौकात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. निगडीतील टिळक चौकाला तळ्याचे स्वरूप आले होते. केजूबाई बंधारा येथे महावितरणच्या वायरवर झाड पडले होते. अग्निशमन पथकाने तत्काळ हे झाड बाजूला काढले.

याबाबत महापालिकेचे आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल म्हणाले, 'शहरातील अनेक भागांतील सोसायट्यांमधून पाणी शिरल्याच्या तक्रारी आल्या होत्या. चिखली, घरकुल, दापोडी, आकुर्डी, रुपीनगर येथे महापालिकेच्या पथकाने जाऊन पंपाद्वारे पाणी उपसले आहे. काही सोसायटीधारकांनी स्वत: पंप लाऊन पाणी काढले आहे. मोठे पंप सज्ज ठेवले आहेत.'

### क्षेत्रीय कार्यालनिहाय नियंत्रण कक्ष

» महापालिकेची आठ क्षेत्रीय कार्यालये आहेत. आठही क्षेत्रीय कार्यालयांत नियंत्रण कक्ष कार्यान्वित केले आहेत. जलद प्रतिसाद पथके कार्यरत केली आहेत. त्यामध्ये आपत्ती व्यवस्थापन, अग्निशमन, आरोग्य, विद्युत, स्थापत्य, उद्यान अशा विविध विभागांतील कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या पथकांच्या माध्यमातून तातडीने उपाययोजना केल्या जात असल्याचे महापालिकेने सांगितले.

### आळंदीत इंद्रायणीच्या पाणी पातळीत वाढ

» जोरदार पावसामुळे आळंदीतील इंद्रायणी नदीचे पात्र दुथडी भरून वाहत आहे. पुंडलिक मंदिरात पाणी शिरले आहे. पुराचे पाणी भक्ती सोपान पुलावरून वाहत आहे. नदीकाठच्या दगडी घाटावर पाणी वाहत आहे. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनचे कर्मचारी चोवीस तास तैनात केले आहेत. नागरिकांनी पाण्यात उतरू नये, असे आवाहन आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी केले आहे.

> “पाऊस मोठ्या प्रमाणात पडत असल्याने पाणी साचण्याच्या तक्रारींचे प्रमाणही अधिक आहे. महापालिकेचे पथक पाठवून पाण्याचा निचरा केला जात आहे. नियंत्रण कक्ष कार्यान्वित केले आहेत. अग्निशन, उद्यान विभागाचेही पथक कार्यरत आहेत.
>
> **- चंद्रकांत इंदलकर, सह आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका**

# लोणावळ्यात अतिमुसळधार पाऊस; २३३ मिमी नोंद

## लोणावळा शहरात आठवडाभरापासून पावसाच्या सरी कोसळत आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

मान्सून पाऊस कोकण किनारपट्टीला धडकलेला असताना ठाण मांडून बसलेल्या अवकाळी पावसानेच मावळवासीयांची चांगलीच तारांबळ उडाली आहे. मावळमधील सर्वाधिक पर्जन्यमान असलेले व वर्षाविहारासाठी प्रसिद्ध असलेल्या लोणावळा शहरात सोमवारी अवकाळी पावसाचा कहर पाहायला मिळाला. अवघ्या चोवीस तासात लोणावळा शहरात तब्बल २३३ मिली मीटर पावसाची नोंद झाली आहे.

लोणावळा शहरात मागील आठवडाभरापासून कमी अधिक प्रमाणात पावसाच्या सरी कोसळत आहेत. मुळ मान्सूनचे आगमन अद्याप झालेले नसले तरीही मान्सूनला तोडीसतोड असा मान्सूनपूर्व अवकाळी पाऊस शहरात कोसळत आहे. सोमवारी सकाळी सात वाजता घेतलेल्या नोंदीनुसार लोणावळा शहरात अवघ्या २४ तासात २३३ मि.मी. अर्थात ९.१७ इंच इतका पाऊस झाला आहे. यंदाचा एकूण पाऊस ४१० मि.मी. वर पोहोचला आहे.

सकाळपासून कमी अधिक पाऊस आणि दुपारनंतर मुसळधार पावसाला सुरूवात झाली. यामुळे शहरातील रस्त्यांवर सखल भागात पाणी साठले होते, तर नाले-ओढे प्रवाहित झाले. गवळीवाडा भागात व परिसरातील काही प्रभागांत काही घरांमध्ये पाणी घुसल्याचे वृत्त समोर आले आहे. अनेक वर्षांनंतर मे महिन्यात मान्सून राज्यात दाखल झाला आहे. तसेच यंदा पाऊस अधिक असण्याचाही अंदाज आहे, त्यापार्श्वभूमीवर लोणावळा शहर प्रशासनाने सर्वांगिण विचार करता योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. अन्यथा, अवकाळी उडाली तशीच दैना मान्सून पावसात उडण्याची शक्यता नाकारता येत नाही.



खरंतर 233 मिमी पाऊस लोणावळाकरांसाठी नवीन नाही. दरवर्षी जुलै व ऑगस्ट महिन्यात एवढा किंवा त्यापेक्षा अधिकचा पाऊस लोणावळ्यात होत असतो. मात्र, अद्याप पावसाळा सुरू झालेला नसताना व सर्वत्र पूर्व मौसमी पाऊस होत असताना अचानक वातावरणात बदल होऊन एवढ्या मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे मोठी तारांबळ उडाली. प्रशासनाकडून नदी, नालेसफाईची कामे यावेळी लवकर सुरू करण्यात आल्याने फारसा त्रास जाणवला नाही. मात्र, अचानक ढगफुटी प्रमाणे पाऊस पडल्याने अनेक भागांत पाणी साचण्याचे प्रकार निश्चितपणे घडले आहेत. प्रशासनाने याकडे लक्ष देत पावसाळ्यात या भागांमध्ये पाणी साचाण्याच्या घटना घडणार नाहीत याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. नागरिकांनी देखील काळजी घ्यावी, जोरात पाऊस सुरू असताना शक्यतो घराबाहेर पडू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### पर्यटकांची गर्दी...

» शनिवार-रविवार असल्याने पहिल्या पावसाच्या सरींचा आनंद घेण्यासाठी आणि वर्षा पर्यटनासाठी मोठ्या संख्येने पर्यटक लोणावळा शहरात दाखल झाले होते. मुंबई, ठाणे, पुणे भागातून हजारो पर्यटक लोणावळा शहरात आले होते. त्यामुळे शहरात वाहनांची व पर्यटकांची गर्दी झालेले पाहायला मिळाली. याचा ताण प्रशासनावर आणि वाहतूक पोलिसांवर आला होता. अनेकदा शहरातील प्रमुख चौकांत वाहतूक कोंडीची स्थिती निर्माण झाली होती. तर वाहनांची संख्या वाढल्याने जुना पुणे – मुंबई महामार्गावर धिम्या गतीने वाहतूक सुरू होती.

# पुणे जिल्ह्यात पावसाचे तीन बळी

## पावसाने सर्वाधिक फटका हा बारामती, दौंड तालुक्याला बसला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यात पावसाने हाहाकार उडविला आहे. गेल्या २४ तासांत पावसाचा कहर सुरूच असून तीन जणांचा बळी गेला आहे. यात सर्वाधिक फटका हा बारामती, दौंड तालुक्याला बसला आहे. पावसाने कर्वेनगर, दौंड आणि खेड तालुक्यातील प्रत्येकी एक असे तिघांचे बळी गेले आहेत. दरम्यान, प्रशासन सकाळपासून पंचनाम्याच्या कामात व्यस्त झाले होते.

पावसाने दौंड तालुक्यात ज्येष्ठ महिलेचा बळी घेतला. शहरातील एका जुन्या बांधकामाची भिंत पावसामुळे कोसळली. यामध्ये त्या दुकानात उभ्या असताना त्यांच्या अंगावर ही भिंत कोसळून जखमी झाल्या. त्यांना खासगी रुग्णालयामध्ये उपचाराकरिता दाखल केले होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. ताराबाई विश्वचंद आहेर (वय ७५), असे मृत्यू झालेल्या ज्येष्ठ महिलेचे नाव आहे.

दुसऱ्या घटनेत भामा आसखेड धरणाच्या कडेला मासेमारी करणाऱ्या युवकाच्या अंगावर सोमवार (दि. २६) दुपारी वीज कोसळून त्याचा जागीच मृत्यू झाला. संतोष गुलाब खांडवे (वय २७, रा. ठाकरवाडी, वेताळे, ता. खेड) असे मृत्यू झालेल्या युवकाचे नाव आहे. दरम्यान, जिल्ह्यात पावसाने थैमान घातले असून शेतीचे प्रचंड नुकसान आणि घरांची पडझड झाली आहे.

तरकारी पिके, ऊस, भाजीपाला, फळबागा, चारा पिकांना असून, मुसळधार बरसणाऱ्या सरींनी तारांबळ उडवून दिली आहे. ठिकठिकाणी वाड्या-वस्त्यांमध्ये पाणी घुसले असून, नागरिकांना बेघर व्हावे लागले आहे. कोकण, गोव्यात पुढील दोन ते तीन दिवस बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी तसेच विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेने वर्तवली आहे.

ठाणे, मुंबई आणि रायगड येथे मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहेच; याशिवाय सिंधुदुर्ग येथे मंगळवारी (दि. २७) आणि रत्नागिरी येथे येत्या ४८ तासांत मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह अतिवृष्टीचा इशारा पुणे वेधशाळेने दिला असून, या जिल्ह्यांना पुढील दोन दिवस रेड अलर्ट देण्यात आला आहे, तसेच धोक्याची सूचनाही देण्यात आली आहे.

पुणे आणि सातारा जिल्हा तसेच त्यांचा घाट विभाग येथे पुढील दोन दिवस तुरळक ठिकाणी अत्यंत जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे या दोन्ही ठिकाणी वेधशाळेने रेड अलर्ट दिला आहे.



### झाड अंगावर पडल्याने एकाचा मृत्यू

**» कर्वेनगर भागात झाड कोसळून दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली. राहुल नरहर जोशी (वय ४९, रा. नऱ्हे, सिंहगड रस्ता) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. जोशी हे सोमवारी सायंकाळी दुचाकीवरून कर्वेनगर भागातून घरी निघाले होते. अलंकार पोलीस ठाण्यापासून काही अंतरावर असलेल्या झाडाची फांदी दुचाकीस्वार जोशी यांच्या अंगावर कोसळली.**

# स्व. निवृत्तीशेठ शेरकर हे समाजाचे दीपस्तंभ - डॉ. गिरीश ओक

## पुण्यस्मरणानिमित्त शिरोली बुद्रुक येथे आयोजित अभिवादन सभेत बोलत होते

**पुणे | प्रतिनिधी**

श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष, माजी खासदार स्व. निवृत्तीशेठ शेरकर यांनी समाजसेवेच्या माध्यमातून शून्यातून विश्व निर्माण केले. त्यांच्या कार्याला दीपस्तंभाची उपमा देत, विद्यमान अध्यक्ष सत्यशील शेरकर हे त्याच मार्गाने पारदर्शकपणे कारखाना सांभाळत असल्याचे गौरवोद्गार ज्येष्ठ अभिनेते डॉ. गिरीश ओक यांनी काढले. स्व. निवृत्तीशेठ शेरकर यांच्या १८व्या आणि पत्नी स्व. हिराबाई शेरकर यांच्या १६व्या पुण्यस्मरणानिमित्त शिरोली बुद्रुक येथे आयोजित अभिवादन सभेत ते बोलत होते.

शरदराव लेंडे, बबनराव थोरात, आशाताई बुचके, तान्हाजीशेठ बेनके, माऊलीशेठ खंडागळे, गंगाराम डुंबरे यांनी स्व. निवृत्तीशेठ यांच्या आठवणींना उजाळा देत आदरांजली वाहिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. गिरीश ओक यांच्या हस्ते स्व. निवृत्तीशेठ आणि स्व. हिराबाई यांच्या प्रतिमांचे पूजन झाले.

प्रास्ताविकात सत्यशील शेरकर म्हणाले की, स्व. निवृत्तीशेठ यांच्या स्मृती जपण्यासाठी दरवर्षी पुण्यस्मरण समारंभ आयोजित केला जातो. त्यांनी घालून दिलेल्या आदर्शानुसार कारखान्याचा कारभार पारदर्शकपणे चालवला जात असून, शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त ऊस लागवड करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

व्हाईस चेअरमन अशोक घोलप, नंदुकाका शेरकर, कार्यकारी संचालक भास्कर घुले, माजी आमदार बाळासाहेब दांगट, आशाताई बुचके, सुमित्राताई शेरकर, योगिताताई शेरकर, राजश्रीताई बोरकर, शरदराव लेंडे, बबनराव थोरात, तान्हाजीशेठ बेनके, माऊलीशेठ खंडागळे, ह.भ.प. गंगाराम डुंबरे, अंकुश आमले, गणेश कवडे, समीर शेरकर, अभिजीत शेरकर, शेतकरी संघटनेचे पदाधिकारी यांच्यासह कारखान्याचे आजी-माजी संचालक, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, शिरोली पंचक्रोशीतील ग्रामस्थ, सरपंच, उपसरपंच, विविध संस्थांचे पदाधिकारी, सत्यशील शेरकर यांचा मित्रपरिवार, कारखान्याचे अधिकारी आणि कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेरकर कुटुंबीयांतर्फे प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.



### आदरांजली आणि स्मृतींना उजाळा

**» शरदराव लेंडे, बबनराव थोरात, आशाताई बुचके, तान्हाजीशेठ बेनके, माऊलीशेठ खंडागळे, गंगाराम डुंबरे यांनी स्व. निवृत्तीशेठ यांच्या आठवणींना उजाळा देत आदरांजली वाहिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. गिरीश ओक यांच्या हस्ते स्व. निवृत्तीशेठ आणि स्व. हिराबाई यांच्या प्रतिमांचे पूजन झाले. भास्कर घुले यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन लक्ष्मण शेरकर यांनी केले, तर आभार अशोक घोलप यांनी मानले.**

### पारदर्शक कारभार आणि शेतकरीहित

**» सत्यशील शेरकर म्हणाले की, स्व. निवृत्तीशेठ यांच्या स्मृती जपण्यासाठी दरवर्षी पुण्यस्मरण समारंभ आयोजित केला जातो. त्यांनी घालून दिलेल्या आदर्शानुसार कारखान्याचा कारभार पारदर्शकपणे चालवला जात असून, शेतकरीहिताचे निर्णय घेतले जात आहेत. यंदा कारखान्याचे विस्तारीकरण झाले असून, पुढील गळीत हंगामात ऊस तोड वेळेत होईल. तसेच, एफ.आर.पी.पेक्षा जास्त ऊस दर आणि दुसरे पेमेंट पुढील महिन्याच्या अखेरीस देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.**